नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ३०/०८/२०२२ (मंगळवार)**

**(सायंकाळ)**

---

## अकस्मात मृत्यु

१) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत कन्हान नदी चिकना शिवार येथे दिनांक २९/०८/२०२२ चे १७.०० वा. सुमारास **ओमकार हेतराम बिसेन (मृतक), वय ३८ वर्ष, रा. दवडीपार ता गोरगाव जि. गोंदिया ह.मु.मौदा** हा अर्जुन बिअर बार मध्ये ५ वर्षापासुन काम करीत असुन हा नेहमी दारू पिण्याचे सवयी होता. दिनांक २०/०८/२०२२ रोजी पासुन त्याची प्रकृती ठिक नसल्यामुळे तो कामावर गेला नाही व बार मालक याने त्याला फोन करून विचारले असता तेव्हा मृतक याने सांगीतले की, 'माझी प्रकृती बरी नसुन मी कामावर येणार नाही' नंतर दिनांक २८/०८/२०२२ रोजी दुपारी ०२.०० वा. दरम्यान फिर्यादी हे अर्जुन बार मध्ये हजर असता मृतकची मुलगी नामे– दृष्टी हिने फोन करून विचारले असता की, 'पप्पा कामावर आले का?' फिर्यादीने सांगीतले कामावर आले नाही. रात्री ०७:३० वा मृतक चे पत्नीने फोन करून सांगीतले की पहाटे ०३:३० वा घरून निघुन गेले अजुन पर्यंत आले नाही' फिर्यादी हे दिनांक २९/०८/२०२२ रोजी सकाळी १०:३० वा. मृतकाचे पत्नीला फोन करून विचारले असता तेव्हा सांगीतले की, सकाळी नदीकडे शोध घेतला असता तेव्हा मृतकाची चप्पल चक्रधर घाट कन्हान नदीच्या काठावर दिसली. पोलीसांनी कन्हान नदीच्या पाण्यात शोध घेतला असता अंदाजे ०५:०० वा दरम्यान कन्हान नदीच्या पात्रामध्ये ओमकार बिसेन यांचे प्रेत मिळुन आले करीता सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राजेश नथ्थुजी सोनकुसरे, वय ५१ वर्ष, रा. लक्ष्मी नगर, मौदा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सपोनि चौधरी मो. क्र. ७०३८८२२२०५ हे करीत आहेत.

२) पो.स्टे. कळमेश्वर :– अंर्तगत २० कि. मी. अंतरावरील मौजा डोरली भिगारे येथे सुनिल **नारायण टापरे (मृतक), वय ३० वर्ष, रा. डोरली भिंगारे** हा दारू पिण्याच्या सवयीचा असून दारूच्या नशेत त्याने दि. ०६/०८/२२ रोजी दुपारी १४.०० वा. चे सुमारास शेतातून घरी आला व घरी ठेवलेली शेतावर मारण्याची विषारी औषध प्राषण केले. त्याची प्रकृती अचानक खराब झाल्याने त्यास उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल नागपूर येथे भरती केले असता उपचारा दरम्याण त्याचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा नझीर कुरेशी, मेयो हॉस्पीटल नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनि श्री राजेन्द्र पाली मो.न. ९०११०३८६७७ हे करीत आहेत.

**३) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंर्तगत एईसी प्लास्टीक लिमिटेड एमआयडीसी बोरी येथे दि. २९/०८/२२ चे ०८.२० वा. चे सुमारास **दिपक ज्ञानकेश शिल (मृतक), वय १८ वर्ष, रा.सिरसोदा ता.जि.रायसेन म.प्र ह.मु. एमआयडीसी बोरी** हा एईसी कंपनी लिमिटेड एमआयडीसी बोरी येथे काम करीत असुन स्क्रॅपचा माल मशीनमध्ये टाकत असतांना २० ते २५ फुट उंचावरून त्याचा तोल गेल्याने तो खाली पडला. त्यामुळे त्याचे डोक्याला, चेहऱ्याला व कमरेला मार लागल्याने त्यास उपचारकामी प्रथम रचाना हॉस्पीटल बोरी व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे रेफर केले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे प्राप्त कागदपत्रावरून सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा विकास बेलसरे, मेडीकल पोलिस बुथ नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार डेकाटे मो.क्र. ७४९८०२०३९९ हे करीत आहेत.

## गळफास लावून मृत्यु

**१) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील जानकी नगर येथे दिनांक २९/०८/२०२२ चे ०३.०० वा. ते ०८.०० वा. सुमारास फिर्यादी यांचे पति **जनार्धन भैयाजी कोल्हे (मृतक), वय ५६ वर्ष, रा. जानकी नगर, काटोल** हे एकल कोडंयासारखे राहत होते. कोणसोबत काहीही बोलत नव्हते. त्यांची प्रकृती ठीक नसली किंवा काही दुखत असले तरीही सांगत नव्हते. दि २९/०८/२२ रोजी पहाटे ०३.०० वा. ते ०८.०० वा. दरम्यान त्यांनी बेडरूममधील सिलिंग फॅनला चादरीने गळफास घेतल्यानंतर ते मृत अवस्थेत आढळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– तारा जनार्धन कोल्हे वय ४७ वर्ष रा. जानकी नगर काटोल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास मपोहवा पंचफुला मोरे मो नं ९०४९६०७११५ या करीत आहेत.

**२) पो.स्टे. कुही** :– अंतर्गत मौजा वार्ड क्र. ३ कुही येथे दिनांक २९/०८/२०२२ चे १२.०० वा. सुमारास **आकाश सुभाष येळणे(आरोपी), वय २८ वर्ष, रा. वार्ड क्र. ३ कुही** याने त्याचे राहते घरी अज्ञात कारणातुन घरातील बेडरूम मधील सिलींग फॅनला गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– स्वप्नील गणेश येळणे, वय २६ वर्ष, रा. वार्ड क्र. ३, कुही यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनि श्री देवीदास ठमके मो. नं. ८७८८५५३१३९ हे करीत आहेत.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**